९६२०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

सं. नं ११६२.

REFBK-0001807

REFBK-0001807

REFBK-0001807

REFBK-0001807

श्रीशंकर प्रसन्न.

सचित्र

# प्रेमळ भजन सुधा.

## भाग. १।२।३।४

संग्राहक व प्रकाशक

## माधव रघुनाथ क्षीरसागर

क्षीरसागर कंपनीचे मालक.

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकानें कायद्याप्रमाणे
ताब्यांत ठेविले आहेत.

इ. सन १९२०

किंमत १२ आणे.

प्रकाशकः—माधव रघुनाथ क्षीरसागर
भायखळा हेन्सरोड चाळ नं. २१४
मुद्रकः—अनंत आत्माराम मोरमकर
श्रीलक्ष्मी नारायण छापखाना, ४०२, ठाकुरद्वार, मुंबई. नं. २

# प्रस्तावना.

संकेतें अथवा हास्य करून ।
भलत्या मिषें घडो शिवस्मरण ।
न कळतां परीसीं लोह जाण ।
झगटतां सुवर्ण करि कीं ॥
नकळतां प्राशिलें अमृत ।
तरि अमर करी कीं यथार्थ ।
औषध नेणतां भक्षित ।
तरी रोग हरण करि कीं ॥

श्रीधर.

आमच्या हिंदुधर्माइतका सर्व संग्राहक धर्म दुसरा नाहीं. एखाद्या महापंडितापासून तों अत्यंत दुराचारी श्वपचापर्यंत सर्व लोकांस त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें परमार्थ संपादनाचे अनेक मार्ग आमच्या धर्मानें आंखून दिलेले असल्यामुळें माझा उद्धार कसा होईल, माझ्या मनास चिरशांति सुखाचा लाभ कोणत्या उपायानें होईल. ही विवंचना करून निराश होण्याचें कोणत्याही हिंदुधर्मीय व्यक्तीस बिलकूल कारण नाहीं. व्यास-याज्ञवल्क्यांसारखे

महर्षि आणि वाल्मीकी—अजामिळासारखे पातकी यांचा उद्धार हिंदुधर्मानें सारख्याच औदार्यानें केला आहे; ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास हे ब्राह्मण; नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, सांवता माळी, सेना न्हावी हे शुद्र आणि चोखा मेळा, रोहिदास चांभार हे अतिशूद्र या सर्वांस एकाच मालिकेंत ओवून, ही अत्यंत सुगंधि संतकुसुममाला भगवंताच्या चरणकमलावर हिंदुधर्मानें विशेषत: महाराष्ट्रांतील भक्तिपंथानेंच अत्यंत प्रेमपूर्वक वाहिली आहे; आणि भगवंतासही ही माला वनमालेप्रमाणेंच अत्यंत प्रिय झाली आहे. असा हा भक्तिपंथ—हा भागवत धर्म—म्हणजे महाराष्ट्रीय साधुसंतांनीं आपल्या वंशजांस देऊन ठेवलेली एक मोठी अमोलिक ठेव आहे.

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।**
**असा सर्व भूमंडळीं कोण आहे ? ॥**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।**
**नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥**

अशा प्रकारच्या धीरगंभीर शब्दांनीं संसार तापत्रयानें

तापलेल्या जीवास धीर देणारा जगांत दुसरा कोणता धर्म आहे?

**कांहीं पडतां जड भारी, दासें आठवावा हरी ॥**
**मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥**

अशा स्वानुभवाच्या उद्गारांनीं, खचून गेलेल्या जीवात्म्याच्या अंगांत नवजीवनाचा संचार करविण्याचें सामर्थ्य 'भागवतधर्माशिवाय' जगांतल्या दुसऱ्या कोणत्याधर्मांत आहे? परमार्थाभिमुख मनुष्यांस मनःशुद्धीइतकी दुसरी कोणतीही गोष्ट आवश्यक आहे. आणि मनःशुद्धि होण्यास सगुण हरिभजनासारखें दुसरें सुलभ साधन नाहीं. वामन पंडितांनीं म्हटलें आहे.—

**गावोनियां मधुरहें हरिनाम नाचा ।**
**पाहों मग भ्रम कसा हरिना मनाचा ॥**

पंडितांनींही आपल्या अनुभवाची गोष्ट सांगितली आहे; आणि तिचें प्रत्यंतर अगदीं सुलभतेनें कोणासहीं सहज पाहतां येईल. मनुष्याच्या भवतापतप्त अंतःकरणास सभोंवतालच्या परिस्थितीची विस्मृति पाडून त्यांस घटकाभर

निर्भेळ ब्रह्मानंदाचा लाभ करून देणाऱ्या या हरिगुण गायनाचा जेवढा प्रसार होईल आणि त्या विषयांवर जेवढीं पुस्तकें होतील, तेवढीं माझ्यामतें थोडींच आहेत. माझे मित्र प्रसिद्ध ग्रंथप्रकाशक रा. **माधवराव रघुनाथ क्षीरसागर** यांनीं अशा तऱ्हेचें **'प्रेमळ-भजन-सुधा'** नामक एक सुंदर सचित्र पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, त्याच्या प्रस्तावनेंदाखल हे दोन शब्द मीं लिहिले आहेत. एरवीं हरिनाम महात्म्य वर्णन करण्यास मजसारख्या पामराची बिलकुल गरज नाहीं. रा. क्षीरसागर यांनीं प्रस्तुत पुस्तकांत निरनिराळ्या हिंदी व मराठी कवींचीं सुमारें ३००निवडक पद्यें दिलीं असून त्यांचा निवड फार चांगली झाली आहे. पुस्तकाचा कागद हल्लींच्या महागाईच्या दिवसांतही चांगला जाड वापरला असून चित्रेंही सुंदर आहेत. गुणज्ञ लोक रा. क्षीरसागर यांच्या या प्रयत्नाचे योग्य चीज करतील अशी मला खात्री वाटते.

ज. र. आजगांवकर.

मुंबई तारीख २८।५।२०

# प्रकाशकाचे दोन शब्द.

चागल्या वाङ्मयाचा महाराष्ट्रसमाजांत प्रसार करणें हेंच आमच्या उद्योगाचें ध्येय असल्यामुळें पूर्वीं आम्हीं श्री हरिभजनामृत भाग १।२।३ छापवून प्रसिद्ध केले असून, आज प्रेमळ भजनसुधा हें पुस्तक भाविक सज्जनांचे सेवेस सादर करीत आहोंत. या पुस्तकाचे चार भाग एकत्र असून भाग १ यांत प्रेमळ व अत्यंत निवडक अशीं मराठी पदें दिलीं आहेत. भाग २ यांत उत्तम अभंग आहेत. भाग ३ यांत हिंदुस्थानीं भाषेंतील निवडक पदें दिलीं असून भाग ४ यांत प्रातः स्मरण भुपाळ्या आर्त्या दिल्या आहेत. सदरहू पुस्तकाची प्रस्तावना रा. रा. ज. र. आजगांवकर यांनी आमचे विनंतीस मान देऊन लिहून दिली याजबद्दल त्यांचे आभारी आहोंत. भयंकर महागाई असून पुस्तकास कागद जाड गुळगुळीत वापरला आहे शिवाय देव व संत यांचीं आठ सुंदर चित्रेंहि पुस्तकांत दिलीं आहेत. पुस्तकाचे मानानें बारा आणे किंमत योग्य आहे असें वाचकाचे ध्यानीं येऊन सदरहू पुस्तकास भरपूर लोकाश्रय मिळेल अशी आशा आहे.


प्रकाशक,



श्री विठ्ठल.

॥ श्रीशंकर प्रसन्न ॥

१८०७



# प्रेमळ भजनसुधा.

भाग १।२।३।४

पद.

भज भज भवजलधिमाजि। मनुजा शिवाला ॥ धृ० ॥ धरिशिल दृढ चरणकमल । घडिभरि तरि करुनि विमल। तरिच सकल पाप शमल। त्यज रे भवाला ॥ १ ॥ सांडुनियां विषयवमन। झडकरि करिं षडरिदमन। पुजि मन हें करुनि सुमन। गिरिजाधवाला ॥ २ ॥ सावध हो करिमि काय। शंकर गुरु बापमाय चिंतुनि कविराय पाय। हृदयीं निवाला ॥ ३ ॥

पद.

कां रे अनाथबंधु येवढें कां केलें निर्वाण । किती अंत पाहशील माझा कंठिं राहिला प्राण ॥ ध्रु० ॥ ब्रह्मादि वंदिती पाय तूं त्रैलोक्याचा धनी । तुझा मी ह्मणवितों मजसी चिंतेची कांचणी ॥ १ ॥ सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणागता । जगदीश जगन्नायका तुझी कलिकाळावर सत्ता ॥ २ ॥ कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशीं । वीतभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी ॥ ३ ॥ मुक्तीच्या माहेरा ऋद्धिसिद्धि तुझ्या दासी । क्षीरार्णवा रंक झालों मरतों उपवासी ॥ ४ ॥

पद.

भक्तीं आकळिला । दयाघन भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥ पार्थरथीं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ १ ॥ प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ २ ॥ रुक्मिणिनें एक्या तुलसिदलानें । गिरिधर प्रभु तुळिला ॥ ३ ॥

पद.

कां हो तुह्मी निर्मळ हरिगुण गाना ? । नाचत आनंदरूपें पंढरिसि जा ना ? ॥ धृ० ॥ काय गणि-केचा याती अधिकार मोठा । पापी अजामिळ तोही नलासे वैकुंठा ॥ १ ॥ ऐसे मार्गे नेणों किती जाले अपरंपार ॥ पंचमहादोषी ज्यांच्या पापा नाहीं पार ॥ २ ॥ पुत्राचिया लोभें नष्ट ह्मणे नारायण ॥ कोण हें कर्तव्य तुका ह्मणे त्याचें पुण्य ॥ ३ ॥

पद.

मसिं बोलूं नको गोविंदा मला आला तुझा राग ॥धृ०॥ गौळियाचे घरीं तूं जासी । घट अवघे फोडुनि खासी । पदरासि धरिसि कशाला ॥ १ ॥ तुह्मी संगत खोटी । आह्मा धाडिसी गाईच्या पाठीं। यशवदेसि जाऊनि सांगरे ॥ २ ॥ पेंद्या सुदामाची जोडी । बलीभद्र त्याचा गडी । एका जनार्दनी । धरूं लाग धरूं लाग ॥ ३ ॥

पद.

हरिहर गुरुराज भजा यमपुरिभय वारा ॥धृ०॥ प्रेमें हरिध्यान धरुनि नारायण बोला । संग त्यजुनि सगुण भजनि रंगढंग डोला ॥ १ ॥ विषय दुःखरूप सकळ तुच्छ भोग त्यागा । सद्गुरुपदकमल नमुनि अचळ दान मागा ॥ २ ॥ दारुण भय घोर पंथि थोर दुःख झालें । करुनि जड कर्म करुनि जन्मुनि बहु गेले ॥ ३ ॥ कर्म सांग घडे ऐसें पुण्य गांठिं जोडा । नारायण परधाम सद्गुरुपद जोडा ॥ ४ ॥

पद.

कसा तारिल पंढरिराव ? ॥ धृ० ॥ भाव धरीना भक्ति करीना । उगाच हरि मज पाव ॥ १ ॥ माता पित्यासी लाथा मारी । मेल्यावरि करि काव ॥ २ ॥ थर थर कांपे शक्ती हरल्या । ह्मणे देवा आतां धांव ॥ ३ ॥ विठ्ठलनामा सद्गुरुचरणीं । दिधला अभय दाव ॥ ४ ॥

पद.

सगणगुण माया । आलि कोल्हाटिण खेळाया ॥ धृ० ॥ प्रपंचाच्या रोविला वेळू । महाशून्यांत मांडिला खेळू । ब्रह्माविष्णु जियेचे बाळू । चला जाउं पहाया ॥ आलि० ॥ १ ॥ आला निर्गुणाचा कोल्हाटी । सोहं शब्द ढोलकें पिटी । उघडुनि चैतन्याची ताटी । चला जाउं पहाया ॥ आलि० ॥ ॥ २ ॥ त्रिकुट श्रीहाट गोल्हाट । वरी साधिलें औटपिट । भ्रमरगुंफेचा शेवट । चला जाउं पहाया ॥ आलि० ॥३॥ खोल्हाटिण बैसलिये डोळां । जाणे गुरुपुत्र आगळा । नरहरि बोधाचिया लीला । चला जाउं पहाया ॥ आलि० ॥ ४ ॥

पद.

सखया रामा विश्रांती तुझिये नामीं । ह्मणवुनि मजला ने त्वरें निजसुखधामीं ॥ ध्रु० ॥ अगणित सुकृतें नरदेहा झाली भेटी । पशु सुत जाया धन धामीं प्रीति मोठी । माझीं माझीं ह्मणुनियां धरिलीं

पोटीं । यांच्या संगें भोगिल्या दुःखकोटी ॥ १ ॥ सोडुनि स्वहिता धांवलों दिशा दाही । शववत झालों मागुता कौतुक पाहीं । परि खळजन हे नेदिती कवडी तेही । परि हे आशापापिणी लाजत नाहीं ॥ २ ॥ जंववरि दृढता तंववरि या तनुची प्रीति । जर्जर झाल्या निंदक हे अवघे होती । यांचीं दुःखें तुजला मी सांगू किती । ह्मणुनि येतो श्रीधर काकूळती ॥ ३ ॥

पद.

धांव रे धांव आतां । दीनवत्सला रामा । संसारसंगें दोषी । नित्य गुंतलों कामा ॥ ध्रु० ॥ तारुण्य अभिमान । देहीं भरला ताठा ॥ वैभव संपत्तीचा । अंगीं फुटला फांटा ॥ १ ॥ विषय सेवितां हें । वय वेंचलें माझें ॥ स्वहित आठवेना । ध्यान चुकलें तुझें ॥ २ ॥ विषय मोकलोनी । शरण तुज मी आलों ॥ एका जनार्दनीं ॥ दास मी तुझा झालों ॥ ३ ॥

पद.

निजवदनीं हरिनाम वसावें । म लगे त्यासी स्नानांत बसावें ॥ ध्रु० ॥ कोण मी कैंचा कोठुनि आलों । हें गुज श्रीगुरुलागिं पुसावें ॥ या पुनर्भवीं नाम निरूपम । ध्यान सगुण हृदयांत ठसावें ॥ २ ॥ अयरामा त्यज प्रभुच्या कीर्तनीं जाउनि प्रेमरसांत घुसावें ॥ ३ ॥

पद.

उलट उलट मावारा प्राण्या गोते फिर खासी । भरला पुर मायेचा लोंढा वाहुनियां जाशी ॥ ध्रु०॥ भवनदीचें पाणी सखया मोठें ओढीतें । भल्या भल्या पोहणारां उचलुन खालीं पाडितें ॥ १ ॥ या अविद्येचा पूर वेगिं ओसरेना । कल्पनासुसरी इची मिठी सुटेना ॥ २ ॥ क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाहीं । दुर्लभ नरतनु गेल्या मग तूं पड-शील पस्ताई ॥ ३ ॥ ह्मणे मुक्ताबाई याच्या अंत-रिची खूण । धरिं सद्गुरुचे पाय तुजला नेतिल उतरून ॥ ४ ॥

पद.

मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें। सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें ॥ ध्रु० ॥ आत्मया रामाचें ध्यान लागलें मज कैसें । क्रियाकर्म धर्म अवघें तेणेंचि प्रकाशे । सत्यमिथ्या प्रकृती पुरुष रामचि अवघा भासे ॥ १ ॥ चित्तचि हरपलें अवघें चैतन्य जाहलें । देखतां देखतां अवघें विश्व मावळलें । पाहतां पाहतेपणा हरिला सर्वस्वें ठकविलें ॥ २ ॥ भक्तिज्ञान वैराग्यलाभ आत्मस्थिती । निर्धारितां नकळे रामरूपीं जडली प्रीति। एका जनार्दनीं अवघा रामचि आदिअंतीं ॥ ३ ॥

पद.

सांगड बांधा रे भक्तीची । रघुनाथनामाची ॥ ध्रु० ॥ संसारसागर सागर । भरला जातो पूर ॥ १ ॥ लाटा उसळती विषयांच्या । बहुत प्रपंचाच्या॥ २ ॥ नरहरि बोधला बोधिला । हरिनामीं रंगला ॥ ३ ॥

पद.

रामकृष्ण नरहरी विठोबा रामकृष्ण नरहरी । कधिं रे कधिं रे कधिं रे डोळा दाविशील पंढरी ॥ धृ० ॥ प्रपंच पसरे कसा विठोबा प्रपंच पसरे कसा । वनीं वागुरें पसरि पारधी पिसे चिलकडे तसा । ह्मणती कोणि न बसा विठोबा ह्मणती कोणि न बसा । कुटुंब परिवाराचे साठीं कुजनीं पसरीं पसा ॥ वाहलों मीं भवपुरीं । विठोबा वाहलों मीं भवपुरीं कधिं रे० ॥ १ ॥ भवाब्धि बुडवी मला विठोबा भवाब्धि बुडवी मला । तुजवांचुनियां तारक न दिसे धांव लौकरी चला । काळमगर पातला । काळ मगर पातला विठोबा उडि घालुनि ओढितसे मजला बहुतचि दिसतो भला । पडुनि राहिलों घरीं विठोबा पडुनि राहिलों घरीं । कधिं रे० ॥ २ ॥ माधव आत्मा खरा विठोबा माधव आत्मा खरा । मी तों पतित पातकी आहें वरि वरि दिसतों बरा । दिसे स्वहित

तें करा विठोबा दिसे स्वहित तें करा। पतितपावन ब्रीदावळि हें संतत हृदयीं धरा। वाहलों मी अवसरीं विठोबा वाहलों मी अवसरीं। कधिं रे ॥ २ ॥

पद.

तूं माझा यजमान ॥ रामा ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं रक्षियलें मज। पोसुनि पंचप्राण ॥ १ ॥ बाहेर निघतां मातेचे स्तनीं। पय केलें निर्माण ॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची। कां करूं चिंता जाण ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर स्वामि रमापति। धरिं माझा अभिमान ॥ ४ ॥

पद.

कृपाघना तुज कां न ये करुणा। शुकसनकादिक वंदिति चरणा ॥ ध्रु० ॥ उत्कंठा मनिं पाय पहाया। लागलि निशिदिनिं जगदाभरणा ॥ १ ॥ अंतरिंचा तूं जाणसि आशय। पूर्ण करिसि कधिं अघसंहरणा ॥ २ ॥ ध्यान भजन मी कांहिंच नेणें। दास म्हणवितों पतितोद्धरणा ॥ ३ ॥

पद.

तुजविण कोण दया करणार ? ॥ धृ० ॥ श्रीजगदीश हरे सुखसिंधो । म्हणतां अघ हरणार ॥ १ ॥ चिंताडोहीं बुडतां तेथें । येउनि कर धरणार ॥ २ ॥ त्यागुं नको मज निजयश राखीं । विश्वातें भरणार ॥ ३ ॥ राजारामीं लीन प्रासादिक । वचनां अनुसरणार ॥ ४ ॥

पद.

ये धांवत कृष्णाबाई । ग माझे आई ॥ धृ० ॥ कौरवपंक्तित । चालें मी वाढीत । कंचुकि फिटली । करूं कायी ग ॥ १ ॥ एक ह्मणे वाढि भात । दुजा मागे पय घृत । किती ह्मणती पात्रीं । पोळी नाहीं ग ॥ २ ॥ स्मरतां मनीं गरुडध्वज । द्रौपदी भाम्मे चतर्भुज । माणिकप्रभुनें बिरडें बांधिलें पाहीं ग ॥ ३ ॥

पद.

कृपाळू रघुवीरें। खादलीं भिलटी-बोरें। उच्छिष्ट आदरें। अंगिकारी रे ॥ ध्रु० ॥ वैभवीं नाहीं चाड। देवातें भावचि गोड। पुरवितो कोड। अनन्याचें रे ॥ १ ॥ दुर्लभ ब्रह्मादिकांशीं। सुलभ वानरांसीं। काय तयांपाशीं। भावेंवीण रे ॥ २ ॥ रामी रामदास ह्मणे। देव हा दयाळूपणें। उठवितो रणें। वानरांचीं रे ॥ ३ ॥

पद.

लटकि अविद्या माया रे। लटकि द्वैतभ्रांति रे। लटिका जीव शिव भाव स्वर्ग नरकप्राप्ति रे ॥ १ ॥ संचित क्रियामाण रे। लटिकें झालें ज्ञान रे। लटिकें प्रारब्ध मजला। सद्गुरुची आण रे ॥ २ ॥ लटिके वर्णाश्रम रे। लटिकें क्रिया कर्म रे। अवघें लटिकें झालें केशव पाहतां परब्रह्म रे ॥ ३ ॥

पद.

चिंत वा रघुवीर ॥ प्राण्या० ॥ ध्रु० ॥ नासिक त्रिंबक रूप मनोहर । पावन गंगातीर ॥ प्राण्या० ॥ १ ॥ पंचवटीमधें पर्णकुटी करिं । सेवुनि राहें नीर ॥ प्राण्या० ॥२॥ मधुर हरीच्या नामाविरहित । न रुचे साकर क्षीर ॥ प्राण्या० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर ह्मणतो येथें । चित्त करावें स्थीर ॥ प्राण्या० ॥ ४ ॥

पद.

स्वस्थ बसावें । हरि ठेविल तैसें रहावें ॥ध्रु०॥ कोणें दिवशीं भोजनासि पक्वान्नें । कोणें दिवशीं खाया मिळति न अन्नें । कोणें दिवशीं नवरंगी पिकलीं पानें । बहु विडे खावे ॥ हरि० ॥ १ ॥ कोणे दिवशीं दारू हवया उडती । कोणे दिवशीं तास मशाला झडती । कोणे दिवशीं दिव्यांत ना वत्ती । गडप निजावें॥ हरि० ॥ २ ॥ कोणे दिवशीं हौदा गज अंबारी । कोणे दिवशीं चळचळाट दरबारीं । कोणे दिवशीं पांयं निघाली स्वारी । निडकल

जावें ॥ हरि० ॥ ३ ॥ कोणे दिवशी शाल दुशाला महालीं । कोणे दिवशीं शेज नवी पलंगों । कोणे दिवशीं बाज मोडकी खालीं । स्वस्थ निजावें । हरि० ॥ ४ ॥ कोणे दिवशीं माळबुक्याची गर्दी । कोणे दिवशीं भजन प्रेमानंदीं । कोणे दिवशीं आपआपणां छंदीं ॥ तुकयानें गावें ॥ हरि० ॥ ५ ॥

पद.

पतीत पावन नाम ऐकुनी आलों मी दारा । पतीत पावन न होसि ह्मणुनी जातों माघारा॥ध्रु०॥ सोडीं देवा! ब्रीद आतां न होसि अभिमानी । पतीत पावन नाम तुजला ठेवियलें कोणीं ॥ १ ॥ घेसी तेव्हां देशी ऐसा असशी उदार । काय देवा! रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥ उच्छिष्टाचें शीत देवा न टाकिसी बाहेरी । कोणीं दिधली भगवंत तुजला भूषणाची थोरी! ॥ ३ ॥ नामा ह्मणे वा तुमचें नलगे मज कांहीं । प्रेम असोद्या हृदयीं तुमचें आठवीन पाईं ॥ ४ ॥.

पद.

राधे तुझा रंग पाहुनी कृष्ण दंग झाला ॥ध्रु०॥ वेणी फणी करुनी चांग । काजळ कुंकु ल्याली भांग । अंगामध्यें चोळी तंग । दावि हरिला गोरा रंग ॥ १ ॥ राधे तुझा संग झोक । कृष्ण पाहुनि लावि नोक । जरी पातळाचा झोक । पदर सावरिला ॥ २ ॥ मथुरेची गौळण थाट । शिरी गोरसाचा माठ । चढून यमुनेचा घाट । पावली हरिला ॥ ३ ॥ मथुरेची गौळण वेडी । चालतांना डोळे मोडी । गोपाळनाथ भक्तगडी । चरणीं ठाव दिला ॥ ४ ॥

पद.

पुरे नाम संसृति तराया कशासि जपतप फार रे ॥ ध्रु० ॥ रा म्हणतां पापक्षय होउनि मकारासि उच्चार रे ॥ १ ॥ उफराट्या उच्चारें झाला वाल्मिकिचा उद्धार रे ॥ २ ॥ श्वपचादिक हे वदतां होती रामरूप निर्धार रे ॥ ३ ॥

पद.

केला राम धणी राम धणी । अघटित ज्याची करणी ॥ धृ० ॥ रामीं रतली वाणी । आतां सुखास काय वाणी ॥ १ ॥ रामावांचुनि कांहीं । आणिक साधन उरलें नाहीं ॥ २ ॥ कोकिळ प्रभुसी ध्यातां । आलें सहजीं निजपद हातां ॥ ३ ॥

पद.

भूक मोठी मज लागली देवा भोजन देईं ॥ याचक मी तुझे द्वारींचा वेगीं प्रसन्न होईं ॥ धृ० ॥ सहज-स्थितीची गुळवणी स्वानंदाचा मांडा ॥ वैराग्याची कढी पातळ नामीं शाका उदंडा ॥ १ ॥ भक्तीच्या शेवया मोकळ्या ज्ञानदुग्ध हें फार ॥ घृत भक्तीची शर्करा वडा उपमा थोर ॥ २ ॥ तुर्या तुरीचें वरण सोऽहंबोधाचा भात ॥ गोड पुरणपोळी उन्मनीं नित्य जेविती संत ॥ ३ ॥ जेणें तृप्त होसी तूं बरा जेथें सुख ना त्रास ॥ गोसाविनंदन जेविला घेतो प्रेमाचा ग्रास ॥ ४ ॥



श्रीसमर्थ रामदास महाराज.

पद

सिताराम सिताराम भजरे मना ॥ भजरे मना वा भजरे मना ॥ पांडुरंग० ॥ अमोलिक जातें वय आतां तरी धरि सोय ॥ असा काय मानव देह येईल पुन्हा ॥ पांडुरंग० ॥ विषयाचें सुख ह्राड ॥ येथें आहे बहु गोड ॥ पुढें आहे अत्रवड यमयातना ॥ पांडुरंग० ॥ रात्रंदिन करिसि मजा ॥ कव्हां येईल यमराजा ॥ घेउनि जाईल प्राण तुझा ॥ निजसदना ॥ पांडुरंग० ॥ तुका ह्मणे एक करा ॥ हरिचरण दृढ धरा ॥ चुकेल चौऱ्याशींचा फेरा ॥ तुझिया प्राणा ॥ पांडुरंग० ॥

पद

आज म्यां ब्रह्म पाहिलें ॥ अगणित सुरगण वर्णिति ज्यासी ॥ कटिकर नटसम चरण विटेवर उभे राहिलें ॥ आज म्यां ब्रह्म० ॥ ध्रु० ॥ एकनाथाच्या भक्तीसाठीं ॥ धांवत आला तो जगजेठी ॥ खांदी कावड आवड मोठी ॥ पाणी वाहिलें ॥

हरिनें पाणी० ॥ आज० ॥ १ ॥ चोख्यासंगें ढोरें ओढितां ॥ शिणला नाहीं तो तत्वतां ॥ जनीसंगें दळितां कांडितां ॥ गाणें गाइलें ॥ हरीनें गाणें० ॥ आज म्यां ब्रह्म० ॥ २ ॥ सांवता माळ्याची भाजी विकिसी॥कबिराचेतशेले विणीसीं ॥ गोरियाचें बाळ रक्षीसी ॥ चिखलीं तुडविलें ॥ जरी तें चिखली ॥ आज० ॥ ३ ॥ दामाजीची रसीद भरली कान्हपात्रा ती उद्धरली ॥ अमृतराय म्हणे ऐसी माऊली ॥ संकट वारिलें ॥ आज० ॥ ४ ॥

पद

आनंदाचा कंद हरि हा देवकी नंदन पाहिला ॥ भक्तासाठीं। देऊन कर कटिं। भीमानिकटीं राहिला । कंसभयानें वसुदेवानें । नंद यशोदे वाहिला ॥ यज्ञ याग जप तपासी न भुले ध्यान धारणेंना कळे॥ निश्चय साचा परि तुकयाचा। भक्तिगुणासीं मोहिला ॥ आनंदाचा कंद० ॥

पद

घ्या मुकुंद मुरारी गोविंद ॥ आनंदकंद घ्या हा छंद ॥ घ्या मुकुंद । घ्या मुरारी । घ्या गोविंद ॥ घ्या मुकुंद० ॥ धृ ॥ गोपवाळा करुनि गोळा मांडि काला सांवळा ॥ अंत नाहीं त्या सखाला होय सकलां आनंद ॥ घ्या० ॥ वाजवि कान्हा वाद्यें नाना गति तनाना व्रजललना ॥ हाल हंबरी फुगड्या टिपरी खेळती नारीनर वृन्द ॥ घ्या० ॥ रामभजन सबरस मिठाई सुधारसोंका सिंध ॥ कहे तुका आंर छंद छोरके भजो भाई गोविंद ॥ घ्या मुकुंद० ॥

पद—सुदामाचें

जाउनि सांगा श्रीहरीला एकदां भेट सुदामाला ॥ बालपणींचा मित्र माझा ॥ झाला द्वारकेचा राजा ॥ रुक्मिणी त्याची नीज भार्या ॥ इतक्या सहित तो राजा ॥ ह्मणुन मी प्रार्थितसे तुजला ॥ एकदां भेट सुदामाला ॥ जावुनि सांग श्रीसखयाला ॥ एकदं भेट सुदामाला ॥ १ ॥ नंदानें भव केला काला ॥

मिळेना अन्न त्या बाळाला ॥ आतां कोण रक्षी कुटुंबाला ॥ अजुन कां मरण येईना मजला ॥ एकदां भेट सुदामाला ॥ २ ॥ धांव पाव यादवराया ॥ चालतां शिणली माझी काया ॥ अझुनी कशी येईना तुला माया ॥ आतां मी जाउं कोण्या ठाया । रुक्मिणी बोले प्रेमाबाईला ॥ एकदां भेट सदामाला ॥ ३ ॥ जाउनी सांगा० ॥

पद.

धाव पाव सांवळे विठाबाई । कां मनिं धरिलि अढी। अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैलथडी ॥ विठोबा कां मनीं ॥ ध्रु० ॥ एकनाथाघरिं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी।कबिराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसी घडी ॥ ॥ कांहो० ॥ ३ ॥ सांवतामाळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसी जुडी। नरसी मेहेत्याची हुंडी पटवुनी त्याचा झालासी गडी ॥ कांहो० ॥ २ ॥ जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी । सजनकसाई मांस विकोतो

त्याची लाविसी धडी ॥ कांहो० ॥ ३ ॥ दामाजीपंताचे वेळीं झालां महार तांतडी । पायीं वाहणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ कांहो० ॥ ४ ॥ चोखामेळ्याचे घरीं येउनी ओढिसि ढोर तांतडी । त्याची स्त्री बहु हांका मारी कोठ दिधली दडी ॥ कांहो० ॥ ५ ॥ गजेंद्राचा धांवा ऐकुनी वेगें घालिसी उडी । अर्जूनरथिं सारथ्य करुनी फेडि त्याची सांकडीं ॥ कांहो० ॥ ६ ॥

पद.

कैसी जाऊं मी वृन्दावना । मुरली वाजवीतो कान्हा ॥ ध्रु० ॥ कांसे पितांबर कस्तुरी टिळक । कुंडल शोभे काना ॥ १ ॥ काय करुं मी कवणा सांगूं । हरि नामाची सांगड आणा ॥ २ ॥ नंदाच्या हरिनें कवतुक केलें । अंतरीं जाणें खुणा ॥ ३ ॥ पैलतिरीं हरि वाजवी मुरली । नदी भरली यमुना ॥ ४ ॥ एका जनार्दनीं म्हणे मना । देवमनोगत न कळे कोणा ॥ ५ ॥

पद.

वारियानें कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले ॥ धृ० ॥ राधेला पाहुनि भुलले हरी । बैल दुहितो आपले घरीं ॥ १ ॥ फणस जंबीर कर्दळी दाटा । हातीं घेउनी नारंगी फाटा ॥ २ ॥ हरिला पाहुनि भुलली चित्ता । राधा घुसळी डेरा खडबडी रिता ॥ ३ ॥ मन मिळालसें मना । एका भुलला जनार्दना ॥ ४ ॥

पद.

भक्तांचीया काजासाठीं ॥ साधूंचीया प्रेमासाठीं ॥ सोडिली मीं लाज रे ॥ धृ० ॥ दुर्योधनसदनीं गेलों । विदुराच्या गृहा आलों ॥ आवडीनें कण्या प्यालों ॥ जोंधळ्याची पेज रे ॥ भक्तां० ॥ १ ॥ धुतां अर्जुनाचे घोडे ॥ सदा राहें मागें पुढें ॥ धर्मगृहीं काढीं उच्छिष्टें ॥ वांधुनीयां माज रे ॥ भक्तां० ॥ २ ॥ वेडीं गौळणींचीं पोरें ॥ त्यांचें ताक प्यालों बा रे ॥ खातां भिल्लिणीचीं बोरें ॥ उच्छिष्टाची चोज रे भक्तां० ॥ ३ ॥

पद.

हरि भज कसा करिल भव पार ॥ ध्रु० ॥ तन मन धन विषयावरि वळतें । भजनीं आळस फार ॥ १ ॥ स्वात्मबुद्धि विचारुनि पाहीं । कोणि न केला उपकार ॥ २ ॥ अमृत म्हणे तुम्ही भजा निरंतर । श्रीधर गुरुचे पाय ॥ ३ ॥

पद.

कांरे नाठविसी कमलनयन वासुदेव ॥ ध्रु० ॥ जपति जया संतसनक । सकळ जना जननिजनक ॥ कांरे० ॥ १ ॥ कलुष हरण विमल चरित । करुनि निजानंदभरित ॥ कांरे० ॥ २ ॥ विचरे आनंदतनय । हृदयिं धरुनि नंदतनय ॥ कांरे० ॥ ३ ॥

पद.

घडि घडि घडि चरण तुझे आठवतो रामा ॥ ध्रु० ॥ हीन दीन, आस तुझी पुर्णकाम आम्हां ॥ १ ॥ मात तात भ्रात नाथ तूंचि एक पाहीं ॥ २ ॥ केशव म्हणे करि दया शरण तुझे पायीं ॥ ३ ॥

पद.

स्मरतां नित्य हरी । मग ती माया काय करी ? ॥ ध्रु० ॥ श्रवणें नमनें अद्वय वचनें । पळतो काळ दुरी ॥ १ ॥ करुणाकर वरदायक हरि जो । ठेवित हात शिरीं ॥ २ ॥ तोचि निरंतर उद्धव चरणीं । अमृतपान करी ॥ ३ ॥

पद.

लागला चटका । हा प्रपंच अवघा लटका ॥ध्रु०॥ चटका लागला मिरेला । छळुनि विष दिधलें तिजला ॥ निर्भय होऊनियां मनाला । घेतला घुटका ॥ १ ॥ चटका लागला कबिराला । छळूं संत आले घराला । बायको विकून सावकाराला । मारिला फटका ॥ २ ॥ चटका लागला जनिला । सोडुन दिधलें गणगोताला । वेगळें होऊनि जन्ममरणाला । तोडिला तटका ॥ ३ ॥ चटका लागला विठ्ठलाला । शरण ब्रह्मानंददयाला । विसरुन पडे दिवा निशीला । लवपळ घटका ॥ ४ ॥

पद.

आह्मि काय कुणाचें खातों रे। तो राम आह्माला देतो रे ॥ ध्रु० ॥ बांधिले घुमट किल्याचे तट। तयाला फुटतो पिंपळवट। तेथें कोण लावितो मोट। वुडाला पाणि घालीतो ? ॥ १ ॥ खडक फोडितां सजिव रोडकी। पाहिली सर्वांनीं वेडकी। सिंधु नसतां तियेचे मुखीं। पाणी कोण घालीतो? ॥ २ ॥ पहारे पहा मातेचिये स्तनीं। चिंतितां रक्त मांस मलखाणी। तिथें विमल दुग्ध घालोनी। कोण पोसीतो ? ॥ ३ ॥ नसतां पाण्याचे बुडबुडे। सदासर्वदा गगन कोरडें। दास ह्मणे जीवन च्हंहं-कडे। पाडुनी सडे पीक उगवितो ॥ ४ ॥

पद.

पार्था सांगों काय रे, सुगम उपाय रे। भजनीं भरलें आत्मसुख, अनपाय रे ॥ धृ० ॥ देव मनोमय रे, मनहि चिन्मय रे। देव भक्त एक तथें, कैचा ध्याता ध्येय रे, ॥ १ ॥ भक्त जें जें भावी रे, देव

तें तें दावी रे । देव भक्त द्वैतवार्ता, कवणें वदावी रे ॥ २ ॥ पत्रपुष्प फळ रे, किंवा कंदमूळ रे । आवडी अर्पिती भक्ती, केवळहि जळ रे ॥ ३ ॥ भक्त मज दावी रे, अमृत्वें भावी रे । अमृताची गोडी मज, कैसी पां न व्हावी रे ॥ ४ ॥ भक्ताच्या आवडी रे, धनाच्या परवडी रे लक्ष्मीच्या वैभवा-हुनी, तेथें मज गोडी रे ॥ ५ ॥ निष्काम भजती रे, निजात्मप्रतीती रे । धांवें पूर्ण काम तो मी, तयांचे सांगतीं रे ॥ ६ ॥ सद्गुरू वामन रे, होउनी आपण रे । भक्ति निजसुख दावी, आदिनारायण रे ॥ ७ ॥

पद.

सांगड बांधा रे भक्तीची ॥ रघुनाथ नामाची ॥ ध्रु० ॥ संसारसागर सागर ॥ भरला जातो पूर ॥ १ ॥ प्रपंच भोंवरा भोंवरा ॥ फिरतसे गरगरा ॥ २ ॥ लाटा उसळती विषयाच्या ॥ बहुत प्रपंचाच्या ॥ ३ ॥ नरहरि बोधला बोधला ॥ हरिनामीं रंगला ॥ ४ ॥

पद.

सासुबाई करुं मी काई शिव्या कांहो देतां॥ध्रु०॥ घागर घेउनि पाणियासी जातां। कान्हा येतो धाइ धाई ॥ १ ॥ दहींदुध घेउनी मथुरेसी जातां। आडवितो ठायीं ठायीं ॥ २॥ मिरा कहे प्रभु गिरीधर नागर। अपराध माझा नाहीं नाहीं॥सासु० ॥३॥

पद.

तोंवरि निजसुख नाहींरे। ऐसें कळलें पाहीरे ॥ ध्रु० ॥ संतसमागम जोडेना। संशयमंडप मोडेना ॥ १ ॥ गुणमेघरजनी नासेना। बोधतमारी प्रकाशेना ॥ २ ॥ केशवस्वामी भेटेना। सबाह्यांतरीं दाटेना ॥ ३ ॥

पद.

पार्था ते तरले ते तरले। जे नामीं अनुसरले ॥ ध्रु० ॥ वैराग्यें गरगरले। जे चित्सुखांत कीं तरतरले ॥ १ ॥ शांतिसुखें आभारले। जैसें लवण जळीं कीं विरलें ॥ २ ॥ देवनाथीं मन मुरलें। स्वरूपब्रह्म दिठीं जग भरलें ॥ ३ ॥

पद ( चाल—लव नच जया मुळी. )

घे गडे राधे । घे गडे कृष्ण । कडेवर घे गोजिरवाणा ॥धृ०॥ पाळण्यांत घालुनि हालवित बसतें याचा डोळा लागेना ॥ बागुलबावाचें भय दावितें त्याच्या बोला भेईना ॥ १ ॥ दहीं वाढिलें वांया गेलें ताटीं बैसुन जेविना ॥ राधे तुझा शब्द ऐकतां टवकारून पाहे कान्हा ॥ २ ॥ उंस केळें फणस नारळ खारिक खोबरें बदाम ॥ नानापरीचा मेवा देतें त्याच्याकडे हा पाहिना ॥ ३ ॥ श्रीरंगेला श्रीरंगेला तुकारामाच्या भक्तिला ॥ राधे तुझें भाग्य मोठें मनरंजन घे घे कान्हा ॥ ४ ॥

पद.

कसा मला टाकुन गेला राम ॥ कसा० ॥ धृ० ॥ या रामाविचुनि झालें मी वेडी ॥ रूप दिसे घनश्याम ॥ १ ॥ घरिंदारीं शेजेवरी पाहतें मी राम ॥ आठवत नाहीं काम ॥ २ ॥ एक जनार्दनीं पाहतें मी डोळां ॥ रूप दिसे घनश्याम ॥ ३ ॥

पद ( चाल—रर्दू लाल )

रडतें माझें बाळ तान्हें समजावितां राहीना ॥ नानापरी समजावितें मागितलें खाया देतें थापटुनी निजवीतें हालवितें पाळणा ॥ सम० ॥ १ ॥ नानापरी करितसे छंद नेत्रांतुनि अश्रु वाहे बिंद ॥ त्याचा डोळा लागेना ॥ सम० ॥ २ ॥ टप धरुनिया दम ॥ सर्वांगीं आला घाम ॥ एका जनार्दनीं प्रेम । येथ्वदेसी मावेना ॥ सम० ॥ ३ ॥

पद.

राधे तुला पुसतो घोंगडीवाला ॥ ध्रु० ॥ मयुर पिच्छाची टोपी शिरावरी । करितो गोपाळ काला ॥ १ ॥ यमुनातटाकीं डाव मांडिला । खुणावितो गोपिकेला ॥ २ ॥ गोणाई म्हणे भिमातीरीं । पुंडलिकें उभा केला ॥ ३ ॥

पद.

बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ ॥ ध्रु० ॥ हे कोण बायकोचे मामे । घरांत

वागती रिकामे । साखर शाल्योदन रुजामे । भोजनभाऊ केवळ ॥ १ ॥ हे कोण वायकोचे साले । तुपावेगळा घांस न गिळे । तांदुळ रांधावे मोकळे । केलें वेंबीचें उखळ ॥ २ ॥ सासू मेहुण्या घरास येती । फराळाच्या पंक्ती बसती । नातें कोरकोरुनि काढिति । अवघा मायेचा गोंधळ ॥ ३ ॥ अमृतराय म्हणे रे मूर्खा । कितिभुललासि मायेच्या सुखा । अंतीं जाशिल एकटा नरका । भज सद्गुरु दयाळ ॥ ४ ॥

पद.

रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥ध्रु०॥ निंदा स्तुती जनाच्या । वार्ता वधूधनाच्या । खोट्या व्यथा मनाच्या । कांहीं न यांत जोडी ॥१॥ साधूचिया सदा तें । सुख देतसे सदा तें । श्रवणीं सुधा मदातें । सोडोनि हात जोडी ॥ २ ॥ विनवी मयूर भावें । सखि हेंचि नित्य गावें । मजला द्रवोनि द्यावें । दुसरें न बंध तोडीं ॥ ३ ॥

पद.

कैसेंही कीर्तन करिता कल्याण बरवें आहे ॥ध्रु०॥ वाल्मीकि उफराट्या नामानें । पावन झाला वक्ता मानें । पतित पुत्राच्या अभिधानें । तरला संसार लवलाहें ॥ कै० ॥ १ ॥ शुका पढवितां पापिणी । केला परमात्मा तो ऋणी । चढली वैकुंठा कुंटिणी । केवढें कौतुक हें पाहे ॥ कैसें० ॥ २ ॥ शुद्ध बुद्धा नसतां ज्ञान । विताळ ईश्वर करितां गाण । तारक नामाचें महिमान । आनंदात्मज गुण लाहे ॥ कैसें० ॥ ३ ॥

पद.

देव करील दया । तयावरि देव करील दया ॥ध्रु०॥ स्वपर ह्मणुनि मति न धरी चराचरिं । निर्मळ भाव जया ॥ तया० ॥ १ ॥ रक्षक जो सकळां कमळापति । जाणुनि न धरि भया । तया० ॥ २ ॥ आनंदतनय ह्मणे हरिचे कीर्तनीं । काशिप्रयाग गया ॥ तया० ॥ ३ ॥

## पद.

धांव विभो करुणाकर माधव । देव दयानिधे देवकीनंदन ॥ धृ० ॥ हे करुणाकर दीन जनोद्धर । हा भव दुस्तर यांतुनि उद्धर ॥ धांव० ॥ काममदादिक गांजिति हे अति । धांव रमापति सेवकहितकर ॥ धांव० ॥ जननमरणभयहरण करी त्वरें ॥ चरणिं शरण दृढ केशव किंकर ॥ धांव० ॥ १ ॥

## पद.

मनुजवरा विषयकाम वाढवूं नको ॥धृ०॥ क्षणिकचि संसार सुखा सार ह्मणुनि गुंतलासि । भजनतंतु करुनि मना तोडवूं नको ॥ १ ॥ कामलोभ मोहबद्ध जाहलासि काय तरी । भावभक्ति धर्म कर्म बुडवूं नको ॥ २ ॥ सद्गुरुसी शरण रिघुन जनन मरण दूर करीं । निरंजनीं लाग भेद रूढवूं नको ॥ ३ ॥

---



श्री ज्ञानदेव महाराज.

॥ श्री विठ्ठलप्रसन्न ॥



# प्रेमळ भजनसुधा.

## भाग २ रा.

अभंग

रूप पाहतां लोचनीं ॥ सुख झालें वो साजणी ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा ॥ तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुतां सुकृताची जोडी । ह्मणुनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

अभंग

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥ तुळसीहार गळां कासे पीतांवर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥ मकर कुंडलें तळपती श्रवणों । कंठीं कौस्तुभमणि विराजीत ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

अभंग

घेईं घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ डोळे तुह्मी घ्यारे सुख । पहा विठोबाचें मुख ॥ ध्रु० ॥ तुह्मी आईका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ २ ॥ मना तेथें धांव घेईं । राहीं विठोबाचे पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥ ४ ॥

अभंग.

वचन ऐका कमळापती । मज रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं । आपण असावें

जवळीं ॥ २ ॥ घेईं घेईं माझी भाक । जरि कां मागेन आणिक ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे देवा । शब्द इतुकाची राखावा ॥ ४ ॥

अभंग.

नको नको मना गुंतूं मायाजाळीं ॥ काळ आला जवळी ग्रासावया ॥ १ ॥ काळाची हे उडी पडेल बा जेव्हां ॥ सोडविना तेव्हां मायबाप ॥ २ ॥ सोडवीना बंधु पाठिची बहीण ॥ सेजेची कामीन आड राहे ॥ ३ ॥ सोडविना राजा देशींचा चौधरी ॥ आणिक सोयरीं भलीं भलीं ॥ ४ ॥ तुका म्हणे तूज सोडविना कोणी ॥ एका चक्रपाणीवांचुनियां ॥ ५ ॥

अभंग.

तूम्हीं संत मायबाप कृपावंत । काय मी पतीत किर्ती वानूं ॥१॥ अवतार तुम्हां धराया कारण । उद्धरावें जड जन जीवां ॥ ध्रु० ॥ वाढवाया सुख भक्तिभाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥२॥

तुका ह्मणे गुण चंदनाचे अंगीं। तैसे तुम्ही जगीं संतजन ॥ ३ ॥

अभंग

जालें रामराज्य काय उणें आह्मांसी। धरणी धरी पीक गाइ वोळल्या म्हसी ॥ १ ॥ राम वेळोवेळां आह्मी गाऊं ओंवियें। दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥ २ ॥ स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळां। नामाच्या गजरें भय सुटलें काळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रामें सुख दिधलें आपलें। तया गर्भवासा येणेंजाणें खुंटलें ॥ ४ ॥

अभंग

तुझें रूप वेळोवेळां ॥ पडो माझ्या दोहीं डोळां ॥ १ ॥ रामनाम वदो वाणी ॥ हरिकथा पडो कानीं ॥ २ ॥ पायीं तीर्थयात्रा घडो ॥ देह संतां घरीं पडो ॥ ३ ॥ सर्व काळ देवपूजा ॥ नमन माझें गरुडध्वजा ॥ ४ ॥ अहो तुका म्हणे देवा ॥ घडो वैष्णवांची सेवा ॥ ५ ॥

अभंग.

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागवीती ॥ १ ॥ काय देवा यासी व्हावे उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ २ ॥ सहज बोलणें हितउपदेश । करूनि सायास शिकवीती ॥ ३ ॥ तुका म्हणे वत्सु धेनुचिये चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥ ४ ॥

अभंग.

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥ १ ॥ हेंचि मज घडो जन्म जन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥२॥ मुखीं सदा नाम संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ॥ ३ ॥ नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारीं । कीर्तन गजरीं सप्रेमाचें ॥ ४ ॥

अभंग.

नाम गाऊं नाम ध्याऊं । नामें विठोबासी पाहूं ॥ १ ॥ आम्ही दैवाचे दैवाचे । दास पंढ-

रीरायाचे ॥ २ ॥ टाळ दिंडी घेउनि हातीं । केशवराज गाऊं प्रीती ॥ ३ ॥ नामा म्हणे लाखोली सदा ॥ अनंत नामें वाहं गोविंदा ॥ ४ ॥

अभंग

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं । मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥ १ ॥ आनंदें कवळ देती एका मुखीं एक । न ह्मणती सान थोर अवघीं सकळीक ॥ २ ॥ हमामा हुंबरी पांवा वाजविती मोहरी । घेतलासे फेर माजी घालुनियां हरी ॥ ३ ॥ लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती । विसरलों देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥ ४ ॥ पुष्पांचा वरुषाव जाली आरतियांची दाटी । तुळसी गुंफोनियां माळा घालिताती कंठीं ॥ ५ ॥ यादवांचा राणा गोपीमनोहर कान्हा । तुका ह्मणे सुख वाटे देखानिया मना ॥ ६ ॥

अभंग

गोविंद गोविंद मना लागलिया छंद ॥ १ ॥
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ ध्रु० ॥
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे आळी । जेवीं नुरेची वेगळी ॥ ३ ॥

अभंग

तुजविण वाणी आणिकांची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥ ॥ तुजविण चित्ता आवडे आणीक । तरी हा मस्तक भंगो माझा ॥ ध्रु० ॥ नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी । जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ २ ॥ कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग त्यांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे काय वांचूनि कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥ ४ ॥

अभंग.

देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ १ ॥ चरण न सोडीं सर्वथा । आण

तुझी पंढरिनाथा ॥ २ ॥ वदनीं तुझें मंगळ नाम । हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवराजा । केला नेम चालवीं माझा ॥ ४ ॥

अभंग.

गोकुळींच्या सुखा । अंत पार नाहीं लेखा ॥ १ ॥ बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ॥ २ ॥ गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥ ३ ॥ तुका म्हणे छंदें । येणें वेधिलें गोविंदें ॥ ४ ॥

अभंग.

संसारताप तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ म्हणऊनि तुझे आठविले पाये । ये वो माझे माये पांडुरंगे ॥ ध्रु० ॥ बहुता जन्मींचा झालों भारवाहीं । सुटीजे हें नाहीं वर्म ठावें ॥ २ ॥ वेढियेलों चोरी अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥ ३ ॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस झालों

कासावीस ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां धांव घाली वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथ ॥ ५ ॥

अभंग

किती तुला द्यावें काकुळती । काय तें संचितीं लिहिलें असे ॥ १ ॥ केली कांहीं सांडी माझी हृषीकेशी । आह्मी कोणापाशीं तोंड वासूं ॥ २ ॥ ब्रीदाचा तोडर गर्जे त्रिभुवनीं । तूंची एक धनी त्रैलोकींचा ॥ ३ ॥ समूळ घेतला पृथ्वीचा हा भार । माझाची जोजार काय तुला ॥ ४ ॥ नको पाहूं अंत पांडुरंग आई । नामा विठोपायीं मिठी घाली ॥ ५ ॥

अभंग

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आह्मां नारायण तैशापरी ॥ १ ॥ सर्व भाव लोभ्या आवडे हें धन । आह्मां नारायण तैशापरी ॥ ध्रु० ॥ तुका ह्मणे एकविध झालें मन । विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥ २ ॥

अभंग

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥१॥ भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतुक्यांसहित त्वां वा यावें । माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझिया गुणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

अभंग.

तुज पाहतां सामोरी । दृष्टी न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडली पंढरिराया ॥ ध्रु० ॥ नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ॥ २ ॥ तुका म्हणे वळी । जीव दिला पायातळीं ॥ ३ ॥

अभंग.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी १ लसुण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥ मोटनाडा विहीर दोरी । अवघी

व्यापिली पंढरी ॥ ३ ॥ सावता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोंविला गळा ॥ ४ ॥

अभंग

पाहें प्रसादाची वाट । द्यावें धुवोनियां ताट ॥ १ ॥ शेष घेउनी जाईन । तुमचें झालिया भोजन ॥ २ ॥ झालों एकसवा । तूह्मां आडूनियां देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । करुनि राहिलों निवांत ॥ ४ ॥

अभंग

आड केलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ॥१॥ आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगारा ॥२॥ देवा लागलीसे नीज । येथें उभ्या काय काज ॥३॥ राग येतो देवा । तुका ह्मणे नेघे सेवा ॥ ४ ॥

अभंग

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥ आतां आड उभा राहे

नारायणा । दयासिंधूपणा साच करीं ॥ २ ॥ वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियांआधीन झालों देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे जैसा तैसा तुझा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ४ ॥

अभंग

हरीचिया दासा हरी दाही दिशा । भावें जैसा तैसा हरी एक ॥ १ ॥ हरी मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ॥२॥ जन्म घेणें लागे वासनेच्या संगें । तेचि झाली अंगे हरीरूप ॥ ३ ॥ हरीपरू झालें जाणणें हरपलें । नेणणें तें गेलें हरिचे ठायीं ॥ ४ ॥ हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

अभंग

कन्या सासुऱ्यासी जाये ॥ मागें परतोनी पाहे ॥ १ ॥ ऐसें झालें माझ्या जीवा ॥ केव्हां

भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलीया माये ॥ बाळ हुरुहुरु पाहे ॥ ३ ॥ हरणी चुकली पाडसा ॥ धुंडाळीती दाही दिशा ॥ ४ ॥ रानीं हिंडो गेली गाय ॥ घरीं वत्स वाट पाहे ॥ ५ ॥ घार फिरत आकाशीं ॥ तिचें चित्त पिलापाशीं ॥ ६ ॥ जीवनावेगळी मासोळी ॥ तैसा तुका तळमळी ॥ ७ ॥

अभंग.

राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसावा ॥ १ ॥ कल्याणाचें जें कल्याण रघुरायाचें गुणगान ॥ २ ॥ मंगळाचें जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ॥ ३॥ राम कैवल्याचा दानी । रामदासा अभिमानी ॥ ४ ॥

अभंग.

अमृताहुनी गोड नाम तुझें देवा । मन माझें केशवा कां वा नेघे ॥ १ ॥ सांग पंढरिराया काय करूं यासी । कां रूप ध्यानासी नये तुझें ॥ २ ॥ कीर्तनीं बैसतां निद्रें नागवीलें । मन माझें गुंतलें

विषयसुखा ॥ ३ ॥ हरिदास गर्जती हरिना माच्या कीर्ती। नये माझ्या चित्तीं नामाम्हण ॥४॥

अभंग.

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ॥ १ ॥ तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥ २ ॥ तूं माझी हरिणी मी तुझें पाडस । तोडीं भवपाश पांडुरंगे ॥ ३ ॥ तूं माझी पक्षिणी मीं तुझें अंडज । चारा घालीं मज पांडुरंगे ॥ ॥ ४ ॥ नामा म्हणे होशी भक्तांचा वल्लभ । मागें पुढें उभा सांभाळिसी ॥ ५ ॥

अभंग.

काय करावें साधन। जेणें जोडे नारायण॥१॥ त्यासी उपाय ता थोडा । गर्जूं विठूचा पोवाडा ॥ २ ॥ प्राक्तनाची दोरी । तसा गुण देता हरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐका । भजा पंढरी नायका ॥ ४ ॥

अभंग.

उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥ १ ॥ संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥ २ ॥ संपुष्ट हा ऱ्हदयपेटीं । करुनि पोटीं सांठवुं ॥ ३ ॥ तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ४ ॥

अभंग.

रूपीं गुंतलें लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥२॥ देहभाव हारपला । तुज पाहतां विठ्ठला ॥ध्रु०॥ कळों नये सुखदुःख । तान हारपली भूक ॥२॥ तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनमागुती

अभंग.

कनककांता न ये चित्ता । तोचि परमार्थी पूरता ॥ १ ॥ हेंचि एक सत्य सार । वाउगा व्युत्पत्तीचा भार ॥ २ ॥ वाचा सत्यत्वें सोवळी । येर कविता ते ओवाळी ॥ ३॥ जन तेचि जनार्दन । एका जनार्दनीं भजन ॥ ४ ॥

अभंग.

कां रे नाठविसी कृपाळू देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥ बाळा दूध कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवें दोन्हीं ॥ध्रु०॥ फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥२॥ तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ४॥

अभंग.

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥ ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणिक लोकांसीं हेंचि सांगे ॥ ध्रु० ॥ विटंबो शरीर होत कां विपत्ती । परी राहो । चित्तीं नारायण ॥ २॥ तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तेची हित ॥३॥



श्री तुकाराममहाराज

## अभंग

टाळी वाजवावी गुढी उभारावी ॥ वाट हे चालवी पंढरीची ॥ १ ॥ हरीनाम गर्जतां ॥ नाहीं भय चिंता ॥ ऐसे बोले गीता भागवत ॥ २ ॥ पताकांचे भार मिळाले आपार ॥ गरजे भिमा तीर जयजयकारें ॥ ३ ॥ पंढरीचा हाट कौलांची पेठ ॥ मिळाल चतुष्ट वारकरी ॥ ॥४॥ खटनट यावे शुद्ध होउनि जावे ॥ दंवडी पिटी भावें चोखा मेळा ॥ ५ ॥

## अभंग

सोयरे धाइरे दिल्याघेतल्याचे । बा अंतकाळींचें नाहीं कोणी ॥ १ ॥ सख्या गोत्र बहिणी सुखाचे सांगाती । मोकळुनी देती अंतकाळीं ॥ २ ॥ आपुलें शरीर आपण पारिखें । परावीं होतील नवल कांहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां सोड यांची आस । धरी रे या कास पांडुरंगा ॥ ४ ॥

अभंग

शेवटची विनवणी संतजनीं परिसावी ॥ १ ॥ विसरतो न पडावा ॥ माझा देवा तुम्हांसी ॥ आतां फार बोलूं काय ॥ अवघें पायीं विदित ॥ २ ॥ तुका ह्मणे पडलों पायां । करा छाया कृपेची ॥ ३ ॥

अभंग

काया हो पंढरी आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडूरंग ॥१॥ भावभक्ति भीमा उदकतें वाहे। बरवा शोभताहे पांडुरंग ॥ १ ॥ दया क्षमा शांती हेंचि वाळूवंट। मिळालासे थाट वैष्णवांचा ॥ ३ ॥ ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद। हाचि वेणूनाद शोभतसे ॥ ४ ॥ दश इंद्रियांचा एक मेळा केला। ऐसा गोपाळकाला होत असे ॥५॥ देहीं देखिली पंढरी जनीं वनीं। एका जनार्दनीं वारी करी ॥ ६ ॥

५१ १८०७

## अभंग

पंढरीस जावें जीवन्मुक्त व्हावें । विठ्ठला भेटावें जिवलगा ॥ १ ॥ काया वाचा मन चरणीं ठेवावें । प्रेम सुख घ्यावें सर्व काळ ॥ २॥ सुखाचें साजिरें श्रीमुख पहावें । जीवे उतरावें निंबलोण ॥ ३ ॥ बाहेर भीतरीं कैवल्य आवघें । वाचे न बोलावे ब्रह्मानंदु ॥ ४ ॥ चिरंजीव नामा कंठीं धरी प्राण । करी तुझें ध्यान रात्रंदिवस ॥ ५ ॥

## अभंग

विषयाचें सुख येथें वाटे गोड ॥ पुढें अवघड यमदंड ॥ १ ॥ मारिती तोडिती झोडिती निष्ठुर ॥ यमाचे किंकर बहुसाल ॥ २ ॥असि पत्र तरु खैराचे विंगळ ॥ निघताती ज्वाळ तैल पाकीं ॥ ६ ॥ तप्त भुमीवरी चालविती पायीं ॥ अग्नि स्तंभा बाहीं कवटाळवीती॥ ४ ॥ ह्मणूनियां तुका येतो काकूळती ॥ पुरे याता याती गर्भवास ॥५॥

## अभंग

पापताप दैन्य जाय उठाउठी। झालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥ ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं। तप तीर्थ जगीं दान व्रत ॥ २ ॥ चरणींचें रज वंदी शूलपाणी। नाचती किर्तनीं त्यांचे माथां ॥ ३ ॥ भव तारावया उत्तम हे नाव। भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे मन झालें समाधान। देखिल्या चरण वैष्णवांचे ॥ ५ ॥

## अभंग

तुझें रूप वेळोवेळां ॥ पडो माझ्या दोहा डोळां ॥ १ ॥ रामनाम वदो वाणी ॥ हरि कथा पडो कानीं ॥ २ ॥ पायीं तीर्थ यात्रा घडो ॥ देह द्वारीं तुझे पडो ॥ ३ ॥ सर्व काळ देव पुजा॥ नमन माझें गरुडध्वजा ॥ ४ ॥ अहो तुका म्हणे देवा ॥ घडो वैष्णवाचो सेवा ॥ ५ ॥

## अभंग

जन्माचें तें मूळ पाहिलें शोधून ॥ दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥ १ ॥ पाप पुण्य करुनी जन्मा येतो प्राणी ॥ नरदेहीं येउन हानी केली ॥ २ ॥ रज तम सत्व आहे ज्याचे अंगीं ॥ याच गुणें जगीं वाया गेला ॥ ३ ॥ तम ह्मणजे काय नर्कची केवळ ॥ रज तो सबळ मायाजाळ ॥ ४ ॥ तुका ह्मणे जेथें सत्वाचें सामर्थ्य ॥ करावया परमार्थ अहर्निशीं ॥ ५ ॥

## अभंग

देहुडा चरणीं वाजवितो वेणु ॥ गोपिका रमणू स्वामी माझा ॥ १ ॥ गुंजवर्ण डोळे माथां बाबर झोटी ॥ मयूर पिच्छवेटी शोभतसे ॥ २ ॥ देखिला गे माये यमुनेचे तीरीं ॥ हात खांद्यावरी राधिकेच्या ॥ ३ ॥ सगुण मेघश्याम लावण्य सुंदर ॥ नामयाचा दातार केशवराजा ॥ ४ ॥

## अभंग

प्राण जाई देहांतून ॥ पुत्र पुसे कोठें धन ॥१॥ कोणा उधार दिलासी ॥ तो सांग आम्हांपाशीं ॥२॥ त्याची खुंटलीसे वाणी ॥ धन पुसती छळोनी ॥ ३ ॥ तुका म्हणे धन ॥ धनासाठीं देती प्राण ॥ ४ ॥

## अभंग

संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःख लेश ॥ १ ॥ तेथें मी राहीन होउनि याचक । घालितील भीक तेचि मज ॥२॥ संतांचिया गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन चित्त ॥ ३ ॥ संताचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥ संतांचा उदीम उपदेशाची पेठ । प्रेम सुख साठ घेती देती ॥ ५ ॥ तुका ह्मणे तेथें आणि नाहीं परी । ह्मणोनी भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

## अभंग

पंढरी पंढरी ॥ विठोरायाची नगरी ॥ १ ॥ भोंवता भिवरेचा वेढा ॥ मध्यें पंढरीचा हुडा ॥ २ ॥ गस्त फिरे चहूंकोनी ॥ टाळ मृदंगाचा-ध्वनी ॥ ३ ॥ ऐसें स्थळ नाहीं कोठें ॥ तुकयाला विठ्ठल भेटे ॥ ४ ॥

## अभंग

आतां ओवाळुनियां काया ॥ ठेवियेली तुझ्या पाया ॥ १ ॥ शरण शरण नारायणा ॥ मज अंगी-कारीं दिना ॥ २ ॥ भावें आलों लोटांगणीं ॥ लोळे लागो तुमचे चरणीं ॥ ३ ॥ तुका म्हण शिर ठेवियलें पायांवर ॥ ४ ॥

## अभंग

जयाचिया द्वारीं सोन्याचा पिंपळ । आंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥ करील तें काय नव्हे महाराज । परी पाहे बीज शुद्ध आंगीं ॥ २ ॥

जेणें हे घातले मुक्तीची गवादी ॥ मेळविली मांदी वैष्णवांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें सुखा काय उणें । राहें समाधानें चित्ताचिया ॥ ४ ॥

## अभंग

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळां हरिच्या दासां ॥ १ ॥ कल्पनेची बाधा न हो कदा काळीं । ही संतमंडळी सुखी असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासा भाविकांसी ॥ ३ ॥ नामा ह्मणे तया असावें कल्याणं । जया मुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥

## अभंग

हेंचि देवा पैं मागत । चरण सेवा अखंडीत ॥ १ ॥ जन्म हो कां भलत्या याती । परी न चुको तुझी भक्ति ॥ २ ॥ नामा म्हणे कमळापती । हेंचि द्यावें पुढता पुढतां ॥ ३ ॥

## अभंग

वारे पांडुरंगा केव्हां भेट दसी । झालों मी परदेशी तुजविण ॥ १ ॥ तुजविण सखा मज नाहीं कोणी ॥ वाटते चरणीं घालूं मिठी ॥ २ ॥ ओवाळावी काया तुझे चरणावरुनी ॥ केव्हां चक्रपाणी भेट देसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी पुरवावी आवडी ॥ वेगीं घालीं उडी नारायणा ॥ ४ ॥

## अभंग

तीन शिरें सहा हात । तया माझा दंडवत ॥ १ ॥ माथां शोभे जटाभार । अंगीं विभूति सुंदर॥ २ ॥कांखे झोळी पुढें श्वान। नित्य जान्हवीचें स्नान ॥ ३ ॥ शंख चक्र गदा हातीं । पायीं खडावा गर्जती ॥ ४ ॥ तुका ह्मणे दिगंबर तया माझा नमस्कार ॥ ५ ॥

## अभंग

धांव पाप सावळे विठाबाई कां मनिं धरिली आढी ॥ अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैल थडी ॥ विठोबा कां मनीं० ॥ धृ० ॥ एकनाथा घरीं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी । कविराचे ते शेले विणुनी त्यांची घालसी घडी ॥ कां हो० ॥ १ ॥ सांवता माळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसि जुडी । नरसीमेहेत्याचा हुंडी पटवुनी त्याचा झालासी गडी ॥ कां हो० ॥ २ ॥ जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या थडी । सजन कसाई मांस वीकितो त्याची लाविसी थडी ॥ कां० ॥ ३ ॥ दामाजीपंताचे वेळीं झाला महार तातडो । पायीं वाहाणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी ॥ कां० ॥ ४ ॥ चोख्यामेळ्याचे घरीं येउनी ओढिसी ढोरें तातडी । त्याची स्त्री बहु हांका मारी कोठें दिधली दडी ॥ कां० ॥५॥

गजेंद्राचा धांवा ऐकुनी वेगें घालिसी उडी। अर्जुन रथिसारथ्य करूनी फेडी त्याचीं सांकडीं ॥ कां हो० ॥ ६ ॥

## अभंग

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी। तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ॥ पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥ असोनीं संसारी जिव्हे वेग करीं ॥ वेदशास्त्र उभारी बाह्य सदा ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा ॥ द्वारकेचा राणा पांडवां घरीं ॥ ४ ॥

## अभंग

तुज पाहतां सामोरी। दृष्टी न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायीं ॥ मिठी पडली पंढरी राया ॥ २ ॥ नव्हे सारितां निराळें ॥ लवण मेळवितां जळें ॥ ३ ॥ तुका म्हणे बळी ॥ जीव दिला पायातळीं ॥ ४ ॥

## अभंग

आमुची मिरास पंढरी ॥ आह्मीं नांदों भीमातीरीं ॥ १ ॥ रखुमादेवी आमची माता ॥ पांडुरंग आमुचा पिता ॥ २ ॥ बंधु पुंडलिक मुनी ॥ चंद्रभागा हे बहिणी ॥ ३ ॥ नित्य नामाचें भोजन ॥ आह्मां अनाथां कारण ॥ ४ ॥ ठाव दिला पायापाशीं ॥ तुका जुनाट मिरासी ॥ ५ ॥

## अभंग

पतिव्रता नेणे आणिकाची स्तुती ॥ सर्व भावें पती ध्यानी मनीं ॥ १ ॥ तैसें मन एकविध झालें ॥ नावडे विठ्ठलाविण दुजें ॥ २ ॥ सूर्य विकासीनी नये चंद्रकळा ॥ गायते कोकिला वसंतासी ॥ ३ ॥ तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे ॥ बोल आणिकांचे नावडती ॥ ४ ॥

## अभंग

पंढरीसी जारे आलीया संसारा ॥ दीनांचा सोयरा पांडुरंग ॥ १ ॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी ॥ कृपाळू तांतडी उतावीळ ॥ २ ॥ मागील परिहार पुढें नाहीं शीण ॥ झालिया दर्शन एकवेळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेदीआणिकांचे हातीं ॥ बैसला तो चित्तीं निवडेना ॥ ४ ।

## अभंग

विटेवरी मूर्त आली भिमातीरीं ॥ लाडका तो हरी यशोदेचा ॥१॥ गोकुळांत यानें चोरी केली फार ॥ ह्मणोनि समोर उभा केला ॥ २ ॥ विटे. वरी उभा कटेवरी हात ॥ लज्जेनें पाहत लोकांकडे ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोर धरिला पुंड- लीकें ॥ चला जाऊं कवतुक पाहावया ॥ ४ ॥

## अभंग

सदा माझा डोळां जडो तुझी मूर्ती । रुक्माईच्या पति सोयरिया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम देई मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥ विठो माऊलीये हाची वर देई । संचरोनि राहीं ऱ्हदया माजी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं नमागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

## अभंग

कृपाळु सज्जन तुह्मी संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण तुह्मी द्यावी पांडुरंगा ॥ कींव माझी सांगा काकुळती ॥ २ ॥ अनाथ अपराधी पतित आगळा । परी पाया वेगळा नको करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मीं निरविल्या वरीं । मग मज हरी उपेक्षीना ॥ ४ ॥

### अभंग

धन्य धन्य पंढरपुर ॥ उभा तेथें रुक्मिणीवर ॥ १ ॥ वाहे भीमा चंद्रभागा ॥ काशी गया ते प्रयागा ॥ २ ॥ सप्तपुरी ते द्वारका ॥ उभा पांडवांचा सखा ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुंडलीका ॥ धन्य तूंचि भक्त निका ॥ ४ ॥

### अभंग

मागणें तें एक तुजप्रती आहे । देशी तरी पाहें पांडुरंगा ॥ १ ॥ या संतांशीं निरवीं हेंचि मज देई । आणिक तुज कांहीं न मागें देवा ॥ २ ॥ तुका ह्मणे आतां उदार तूं होईं । मज पायीं ठेवीं संताचिया ॥ ३ ॥

### अभंग

